SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000
E-mail address- affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९११३६)
East:1962
NAAC 'A' Grade

जा.क्र. शिवाजी विद्यापीठ /संलग्नता टी.१/प्रशांत/१९२० दिनांक :१२/८/२०२०

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/शिक्षण संस्था,

विषय :- भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन दिन समारंभ शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२०

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्रमांक सीईआर २०२०/प्र.क्र.६९/३० दिनांक १०/८/२०२०.

२) डॉ.धनराज माने शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र शासन यांचे जा.क्र.उशिसं/२०२०/१५ ऑगस्ट/मवि-१/५०७३ दि.१०/८/२०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भाबाबत आपणास आदेशानुसार कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय क्रमांक १ नुसार शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण, पुणे-१ यांचे संदर्भीय क्रमांक २ च्या पत्रानुसार शासन परिपत्रकास अनुसरून सूचना व त्याबाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा. त्या अनुषंगाने सोबत शासन परिपत्रक जोडून पाठवित आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता टी-१ विभाग

सोबत :-संदर्भ क्रमांक १ व २

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५२५१२, २६१३०६२७, २६१२८६२९ फोन नं.०२०/२६१२११५३

क्रमांक : उशिसं/२०२०/१५ ऑगस्ट/मवि-१/ ५०७३ दिनांक १०.०८.२०२०

प्रति,

१.मा.कुलगुरु,
सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,

**विषय :भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन दिन समारंभ**
**शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२०**
**संदर्भ :** शासन परिपत्रक क्रमांक सीईआर २०२०/प्र.क्र.६१/३०, दिनांक १०.०८.२०२०

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी सदर आदेशान्वये दिलेल्या संबंधित सूचनांच्या अनुषंगाने सर्व अकृषी / अभिमत / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था यांना सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

प्रत : मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ यांना माहितीसाठी

Scanned by CamScanner

भारतीय स्वातंत्र्यदिनाचा वर्धापन दिन समारंभ
शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२०

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२०/प्र.क्र. ६९ /३०
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख : १० ऑगस्ट, २०२०.,

**शासन परिपत्रक**

शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२० रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७३ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. करोना विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता, दर वर्षीप्रमाणे हा कार्यक्रम आयोजित करण्यावर मर्यादा येणार आहेत. ही वस्तुस्थिती व सावधगिरीच्या उपाययोजना विचारात घेता, यावर्षी राज्यात स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) स्वातंत्र्य दिनाचा वर्धापनदिन राज्यात सर्व विभागीय / जिल्हा / उप विभागीय / तालुका मुख्यालयात ध्वजारोहण करुन साजरा करण्यात येईल.

२) त्यास अनुसरुन विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोकण यांनी आपापल्या विभागातील विभागीय तसेच जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्याची योग्य ती व्यवस्था करावी.

३) राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मंत्रालय, मुंबई येथे सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण करुन साजरा करण्यात येईल. पुणे येथे मा.राज्यपाल महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.

४) तसेच उर्वरित विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी संबंधित मा.पालकमंत्री महोदय ध्वजारोहण करतील.

५) ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ९.०५ वाजता आयोजित करण्यात यावा सदर दिवशी सकाळी ८.३५ ते ९.३५ वा. या वेळेत ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयाला अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो सकाळी ८.३५ वा. च्या पूर्वी किंवा ९.३५ वा. च्या नंतर आयोजित करावा.

६) राष्ट्रध्वजाला वंदन करताना जन-गण-मन हे राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बँड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजवावा.

७) यावेळी करण्यात येणा-या भाषणांचा विषय हा १५ ऑगस्ट स्वातंत्रदिनाचे महत्व विषद करणारे तसेच उपस्थितांना देशाची एकता व अखंडता याकरीता कार्य करण्यासाठी प्रेरित करणारे असावे.

८) ध्वजारोहण करणारे मा.मंत्री / राज्यमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी वेळेवर पोहचू शकणार नसल्यास विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी ध्वजारोहण करुन ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार

Scanned with CamScanner

पडेल याची दक्षता घ्यावी. संबंधित प्रांत अधिकारी व तहसिलदार हे अनुक्रमे उपविभागीय मुख्यालय व तालुका मुख्यालय येथे ध्वजारोहण करतील.

९) स्थानिक लोक प्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नी व आई-वडील तसेच करोनायोद्धा जसे डॉक्टर्स, सफाई कामगार, आरोग्य सेवक/ यांच्याबरोबर या आजारावर मात केलेल्या काही नागरिकांना निमंत्रित करावे.

१०) करोना विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता, स्वातंत्र्य दिनाचा संपूर्ण कार्यक्रम सामाजिक अंतर (Social Distancing) संदर्भातील सर्व नियम पाळून संपन्न होईल, याची संपूर्ण जबाबदारी आयोजकांची असेल. आयोजकांनी त्यानुसार मान्यवरांना निमंत्रित करण्याची कार्यवाही करावी. समारंभास उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींनी राष्ट्रीय पोषाख परिधान करावा.

११) सर्वांसाठी मास्क बंधनकारक आहे. सुरक्षित वावराच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करावे व अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाइटद्वारे थेट प्रक्षेपण करावे.

१२) या कार्यक्रमातून व सोशल मीडियाव्दारे "आत्मनिर्भर भारत" या घोषणेचा प्रचार करावा.

१३) दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे-: वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय यांच्या स्तरावर Online पध्दतीव्दारे वाद-विवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा /देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धांचे आयोजन करावे .महत्त्वाच्या योजनेचा शुभारंभ करावा. सोशल मीडीयाव्दारे निवडक विध्यार्थी/विध्यार्थीनींचे देशभक्तीपर गाणे/भाषणे आयोजित करावेत. शासकिय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी. एखादया विषयाचा Webinar आयोजित करावा. एनएसएस व एनसीसीद्वारे देशभक्तीपर Online मोहिम राबविण्यात यावी. तसेच सोशल मीडीया व Digital माध्यमाव्दारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबंधातील गाण्यांचा प्रचार करावा /संदेश दयावा. नागरिकांनी घराच्या बाल्कनी /गच्चीवरुन राष्ट्रीय ध्वज हलवणे, याप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रमाव्दारे देखील स्वतंत्रतादिन साजरा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

१४) राज्यातील सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतीवर(खेड्यांमध्ये सुद्धा )तसेच ऐतिहासिक महत्त्वाच्या किल्ल्यांवर (उदा .रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद, सिताबर्डी) राष्ट्रध्वज उभारण्यात यावा.

१५) राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक : एफएलजी-१०९१/३०, दिनांक २० मार्च, १९९१ व क्रमांक एफएलजी - १०९१/(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ आणि परिपत्रक क्रमांक : एफएलजी १०९८/३४३/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजारोहणाची रंगीत तालीम घेतली जाईल याचीही दक्षता घ्यावी. राष्ट्रध्वज चांगल्या स्थितीत असल्याची व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

१६) विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाची व्यवस्था करणार असल्यामुळे तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे मुंबईतील कार्यक्रमासाठी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग व जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. मुंबई उपनगर जिल्हा येथे जिल्हाधिकारी ध्वजारोहणाची सर्व तयारी करतील. विभागीय आयुक्त, कोंकण हे कोंकण भवन येथील समारंभाची व्यवस्था करतील.

Scanned with CamScanner

२. वरील प्रमाणे सर्वसाधारण निदेश देण्यात आले असले तरी, संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना आपापल्या अधिकारक्षेत्रात करोना विषाणूच्या संसर्गाची व्याप्ती विचारात घेवून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व लक्षात घेता, साजेसा समारंभ साजरा करण्यासंबंधी पालक मंत्री महोदयांच्या सहमतीने आवश्यक ती उचित कार्यवाही करण्यासाठी मुभा देण्यात येत आहे. करोना विषाणूची पार्श्वभूमी विचारात घेता, स्वातंत्र्य दिनाचा संपूर्ण कार्यक्रम सामाजिक अंतर (Social Distancing) संदर्भातील सर्व नियम पाळून संपन्न होईल, याची संपूर्ण जबाबदारी आयोजकांची असेल.

३. हा कार्यक्रम साजरा करताना करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय व तसेच आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, यांनी दिलेल्या सूचनांचे काटोकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून , त्याचा संकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(उमेश म. मदन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई ,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (मंत्रालयीन विभागाच्या खालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई
पोलीस आयुक्त, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई
सर्व विभागीय आयुक्त

Scanned with CamScanner